# *वीरशैव लिंगायत धर्मपरंपरेतील तत्त्वविचार : अष्टावरणविज्ञान*

संशोधक : ***शिवशरण गुरुपदआप्पा रटकलकर**, लक्ष्मीनगर हिंगोली ४३१ ५१३*

*चरभाष : ९४२३९५१००६*

**प्रस्तावना :**

विशिष्ट विचारधारा व आचारमार्ग धारण करतो तो धर्म - अशी ढोबळ मानाने धर्माची व्याख्या करता येईल. तसे पाहता अनेक विचारवंतांनी धर्माच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत. जसे की - ' ***यतोऽभ्युदय निःश्रेयस सिद्धिःसधर्मः*** '

भावार्थ :

धर्म म्हणजे सहज प्रवृत्ती, उपजत वृत्ती,अंगभूत गुणविशेष,सहज प्रवृत्ती, उपजत वृत्ती,अंगभूत गुणविशेष धारण करणारी एक विशिष्ट साचेबद्ध आचारसंहिता म्हणजे धर्म.

धर्म परंपरांना एक तात्त्विक बैठक असते. किंबहुना त्यामुळेच त्या त्या धर्मांना विशिष्ट महत्व प्राप्त झालेले असते. ठराविक जन समुदायाने स्वखुशीने स्वीकारलेली आचार विचार पद्धती म्हणजे धर्म, असेही म्हणता येईल. आपल्या भारतीय समाजरचनेत असे अनेक धर्म पंथ शतकानुशतके आपले अस्तित्व टिकवून आहेत. प्राचीन आणि अर्वाचिन धर्म परंपरेत सिंधू संस्कृती, हिंदू धर्म, बौद्ध धर्म, जैन धर्म, शैव संस्कृतीत वीरशैव लिंगायत धर्म, शीख धर्म, म्लेन्छ मुस्लिम धर्म, ख्रिस्ती पारसी इसाई धर्म अशी अनेक नावे घ्यावी लागतील. कालपरत्वे बदलत गेलेली संस्कृती काही धर्म संपवण्यात यशस्वी झाली.याउलट ज्या धर्मांची तात्त्विक बैठक योग्य ते अनंतकाळ टिकून राहिले. त्यांना भरपूर अनुयायी मिळाले. ते मोठे आणि चिरंतन ठरले.

अशीच भव्य दिव्य परंपरा लाभलेल्या शैव संस्कृतीतील वीरशैव लिंगायत धर्माबद्दल आपण येथे चिंतन पाहणार आहोत.

प्राग्वैदिक काळापासून शैव संस्कृती शिव तत्त्वाचे विवेचन मांडत आलेली आहे. *शिव* हे एक शाश्वत तत्त्व आहे. प्रकृती आणि पुरुष यांच्या *अविनाभाव* संबंधातून सकल सृष्टीचा उद्गम झाला असे मानले जाते. उत्पत्ती - स्थिती - लय या तिन्हीस मूलाधार *शिवच* आहे. शिवापासून शक्ती आणि शक्तीपासून सृष्टीनिर्माता ब्रह्मा, पालनकर्ता विष्णू आणि लयकर्ता महेश अशी व्यवस्था निर्माण झाली. असे पुरणादिकात उल्लेख आलेले दिसतात.

***त्रैलोक्यसंपदालेख्यसमुल्लेखनभित्तये । सच्चिदानंदरूपाय शिवाय ब्रह्मणे नमः ।।१।।***

त्रैलोक्यसंपदाचित्र रेखावयास भिंत जो अशा सच्चिदानंदरूपी परशिवब्रह्मास उत्पत्ती स्थिती लयास कारण मानले जाते. त्यास माझे वंदन असो, असा भावार्थ वरील श्लोकात दडलेला आहे.

*ब्रह्मेति व्यपदेशस्य विषयं यं प्रचक्षते । वेदान्तिनो जगन्मूलं तं नमामि परं शिवम् ।।२।।*

वेदान्ती असे बोलतात की ब्रह्म शास्त्राचे प्रतिपाद्य जे,जगताचे मूळ असे ते परमतत्त्व शिवच आहे.त्या शिवास माझे नमन असो.शिव हा सर्व जिवांचा पती आहे म्हणून त्याला *पशुपति* असेही म्हटले जाते. तो सर्व विश्वाचा नाथ आहे म्हणून *विश्वनाथ* असेही संबोधन दिले जाते. वीरशैव लिंगायत दर्शनात शिवाची उपासना ही स्थावर शिवपिंडी आणि *शिवलिंग* रुपात केली जाते. सगुण आणि निर्गुण अशी दोन्ही प्रकारे त्याची भक्ती केली जाते. स्थावर शिवलिंगाचे मंदिर उभारले जाते ; तिथे सर्व भक्त भजन, पूजन, नामस्मरण करुन आराधना करतात. याउलट गुरुकडून शिवदीक्षा प्राप्त करवून घेतलेले वीरशैव लिंगायत भक्त मात्र आपल्या शरीरावर धारण केलेल्या *इष्टलिंगाचीच* भक्ती करतात. जणू इष्टलिंगपूजा एक व्रतच

ते माणतात. त्यामुळे मंदिरात किंवा देवळात जाण्याचे सोपस्कार त्यांना करण्याची गरज नसते असा धार्मिक क्रियाचार आहे. विस्तृतपणे आपण त्याबद्दल जाणून घेऊयात.

*****वीरशैव लिंगायत धर्म : मूलभूत तत्त्वे******

वीरशैव लिंगायत धर्म हा मूलभूत १९ तत्त्वांवर आधारित आहे.

***१) अष्टावरण - ८***

***२) पंचाचार - ५***

***३) षटस्थल - ६***

*वीरशैव* या शब्दाचा अक्षरशः अर्थच मुळी असा आहे :

***विद्यायां शिवरूपायां विशेषाद् रमणं यतः । तस्मादेते महाभागा वीरशैवा इति स्मृताः ।।१५।।***

अर्थात : शिवस्वरूपी विद्येमध्ये विशेषत्वाने रमणारे, रस घेणारे असे जे शिवभक्त त्यांना 'वीरशैव' असे म्हणतात. विशेषत्त्वाने दुसऱ्या श्लोकात चिंतन आलेले आहे.

***वीशब्देनोच्यते विद्या शिवजीवैक्यबोधिका। तस्यां रमन्ते ये शैवा वीरशैवास्तु ते मताः ।।१६।।*** ( श्रीसिद्धान्तशिखामणी परिच्छेद ५ / १५,१६)

*वी* म्हणजे विद्या - जीव शिव यांच्यातील अभेद बोध करणारी विद्या. आणि *र* म्हणजे त्या विद्येत रमणारा असा जो *शिवभक्त* म्हणजे *वीरशैव* म्हणून गणल्या जातो.

दुसरा एक अर्थ असाही सांगितल्या जातो.

*वी* म्हणजे विरोध आणि *र* म्हणजे रहित. इतर धर्मास जो विरोध करत नाहो तो वीरशैव. आपले धर्माचरण तो एकनिष्ठेने करत असतो.

****तैसे वीरशैव आम्ही क्रियावंत ।****

****झाला जरी अंत सुख मानू ।।**** या धारणेवर तो दृढ असतो.

तिसरा एक अर्थ असाही काढल्या जातो की - *वी* म्हणजे *विकल्प* आणि *र* म्हणजे *रहित* असा तो वीरशैव. ज्याचे मन विकल्प रहित, परिशुद्ध आहे आणि जो शिव हेच एकमेव आपले आराध्य दैवत आहे असे समजून शिवभक्ती रत आहे तोच आचारशील, सुज्ञ जाणकार क्रियाशील भक्त वीरशैव म्हणवून घेण्यास योग्य ठरतो.

*वीरशैव* आणि *लिंगायत* अशा शिवभक्तांच्या दोन भिन्न परंपरा आहेत की काय? अशीही शंका काहीवेळा माणसाच्या मनात घर करु शकते. परंतु यावर अनेक तत्त्व चिंताकांनी विचारमंथन करुन संभ्रम मिटवलेला आहे. जसे की ---

*श्रीमत्काशीविश्वाराध्यज्ञानसिंहा सनाधीश्वर* *श्री १००८ जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींनी* त्यांच्या *वीरशैव तत्त्वदर्शन* या ग्रंथात विवेचन केलेले आहे,

" लिंगायत हा शब्द वीरशैव शब्दाचा पर्यायवाचक आहे. ***लिंगं आयतिः यस्य स लिंगायतः**।* ही लिंगायत शब्दाची व्युत्पत्ती होय. आयति म्हणजे उत्तरकाल.

*उत्तरः काल आयतिः* (अमरकोश). लिंगदीक्षा घेतल्यानंतर पुढील काळात ज्याचे जीवन लिंगधारण, लिंगपूजा, लिंगध्यान यांमध्ये व्यतीत होते तो लिंगायत. आयत्त म्हणजे अधीन. जो निरंतर लिंगाधीन होऊन राहतो तो लिंगायत. लिंग + आयत्त म्हणजे लिंगायत्त.

क्रियादीक्षेमध्ये 'आयत्त' हा एक संस्कार आहे. दीक्षेच्या वेळी श्रीगुरू शिष्याच्या तळहातावर लिंग देऊन ' *लिंगायत्तो भव* ' म्हणजे लिंगाच्या संपूर्ण अधीन होऊन राहा.असा उपदेश करतात. गुरुपदेशानुसार शिष्य लिंगाच्या संपूर्ण अधीन होऊन

वर्तन करतो. म्हणजेच लिंग आयत्त *लिंगायत्त* होतो. 'लिंगायत्त' या शब्दाचेच सुलभीकरण ' *लिंगायत* ' असे झाले. कालांतराने वीरशैव शब्दाचा लिंगायत हा पर्याय ठरून तो रूढ झाला. (लिंगायत हा शब्द वीरशैवांच्या अनन्य लिंगनिष्ठेचा द्योतक आहे. त्यामुळे लिंगायत हा वीरशैव शब्दाचा पर्यायवाचक शब्द आहे." अशी युत्पत्ती मांडलेली आढळते.

[ *वीरशैव तत्त्वदर्शन* पृ.१८

डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी संपादक : शे.दे.पसारकर, शैवभारती शोध प्रतिष्ठान प्रकाशन २०१९ ]

तात्पर्य उपरिनिर्दीष्ट १९ तत्त्वांचे आचरण वीरशैव लिंगायत भक्त करत असतात. सूक्ष्मागमात वर्णन केल्याप्रमाणे वीरशैवांचे साधारणतः सामान्य, विशेष, निराभार अशा तीन अवस्था आहेत.

*सामान्य वीरशैव लिंगायत* अष्टावरणाचे निष्ठेने पालन करतो. यापैकी त्याच्यासाठी पूजनीय तीन आवरणे : १) गुरु २) लिंग ३) जंगम

धारणीय आवरणे : ४) भस्म ५) रुद्राक्ष ६) मंत्र

आणि स्वीकारणीय आवरणे : ७) तीर्थ ८) प्रसाद

*विशेष वीरशैव लिंगायत* पंचाचारांचे निस्सीम पालन करतो. त्याचा जीवन व्यवहाराच नित्याचार ठरतो.

१) सदाचार २) शिवाचार ३) लिंगाचार ४) भृत्याचार ५) गणाचार

*निराभार वीरशैव लिंगायत* पंचाचार आणि अष्टावरण यांचेतर पालन करतोच पण उन्नत अवस्था म्हणजे *षटस्थल* प्राप्ती करवून जीवनमुक्त लक्षणे अंगीकरतो. ती अशी १) भक्तस्थल २) माहेश्वरस्थल ३) प्रसादीस्थल ४) प्राणलिंगीस्थल ५) ऐक्यस्थल

अशाप्रकारे साधक सामान्य, विशेष आणि निराभार या तीन अवस्था पार करुन *लिंगांगसामरस्य* म्हणजे जीवनमुक्ती प्राप्त करवून घेतो.

*१९ तत्त्व सविस्तर चिंतन* :

_अष्टावरण_ :

वीरशैव चंद्रज्ञानागमात आलेला उल्लेख

*गुरुर्लिंगं जंगमस्य तीर्थं चैव प्रसादकः ।*

*भस्मरुद्राक्षमंत्राश्चेत्यष्टावरणसंज्ञिताः ।।* [ चंद्रज्ञानागम - क्रियापाद २.१.२]

तसेच वीरशैव अभंगकार श्रीसंत शिरोमणी शिवयोगी *मन्मथस्वामींनी* एका अभंगातून अष्टावरणाचे सविस्तर निरूपण केले आहे.

*गुरु आणि लिंग जंगमाची सेवा ।*
*देई मज देवा जन्मोजन्मी ।।१।।*
*रुद्राक्ष्यांच्या माळा भस्म लावू भाळी ।*
*हेचि चंद्रमौळी देई मज ।।२।।*
*तीर्थ आणि प्रसाद मंत्र षडाक्षर ।*
*ध्याऊ उमावर जन्मोजन्मी ।।३।।*
*मन्मथ शिवलिंग म्हणे आचरण ।*
*हेचि अष्टावरण वीरशैवा ।।४।।*

अशाप्रकारे एकाच ठिकाणी सर्व आवरणे माऊलींनी वर्णीली आणि त्याची महतीही सांगितली. ज्याप्रमाणे एखाद्या वस्तूला संरक्षक आच्छादन केलेले असते, सुरक्षा कवच लावलेले असते त्याप्रमाणे ही धर्म संप्रदायिक आवरणे वीरशैव लिंगायतांना जणू भक्ती पंथात स्थिर ठेवणारी आवरणे आहेत. त्यामुळे आचार, विचार आणि उच्चार संयमित- नियंत्रित राहतात. म्हणून अष्टावरणांचे पालन करणे अत्यावश्यक असते. साधकांच्या जीवनात आवरणांची भूमिका :

*१) गुरु :*

गुरूंची साधकाच्या जीवनातील भूमिका अत्यंत महत्वाची आहे. शिष्याच्या जीवनातील अज्ञानरूपी अंध:कार घालवून ज्ञानरूपी प्रकाश निर्माण करुन स्व-स्वरूपाचे दर्शन घडवितात ते गुरु / सद्गुरू.

**अज्ञानतिमिरांधश्यज्ञानान्जनशलाकय : ।**

**चक्षौर्उन्मिलीतं येन तस्मैश्रीगुरवे नमः ।।१०/** अ. ३* [ शिवानंद बोध - श्रीगुरूगीता, श्रीसंत बसवलिंगकृत ]

म्हणून गुरूंचे विशेष महत्व आहे. सत्य स्वरूपाचे ज्ञान करवून देतात ते गुरु. *गु शब्द अंध:कार बोलीजे । रु शब्द प्रकाश बोलीजे । अंध:कारा प्रकाश जाणीजे । जाणे तो गुरु ॥*

दुसऱ्या व्युत्पत्तीत *गु शब्द गुणातीत । रु शब्द रूपातीत ।*... असेही म्हटले आहे. प्राप्त वस्तूचे यथार्थ ज्ञान झाल्याशिवाय आनंद मिळत नाही. दृष्य, दृष्टा, दर्शन हा त्रिवेणी संयोग आत्म साक्षात्कार घडवून आणतात ते सद्गुरू. अशी वीरशैव लिंगायतांची धारणा असते. *जन्मा आधी लिंग गर्भाशी धारण...।* इथपासून ते मारणोपरांत इष्टलिंग हातावर देऊन अंत्येष्टी संस्कार करेपर्यंत गुरुचे सानिद्ध्य प्रमाण मानले जाते. आठव्या महिन्यात गर्भाधान संस्कार करुन आठव्या वर्षी शिवदीक्षा देणे आणि धर्म परायण ठेवणे ही गुरूंची जबाबदारी असते. शिष्यानेही गुरुवचनांवर विश्वास ठेवून आचारधर्म एकनिष्ठतेने पाळला पाहिजे हा संकेत असतो.

यामुळेच वीरशैव लिंगायत समजजीवनात गुरूंना अनन्यसाधारण महत्व आहे.

गुरुगीतेत आलेला श्लोक याचे प्रतिपादन करतो --

**ध्यानमूलं गुरोर्मुर्तिःपूजामूलं गुरोः पदं । मंत्रमूलं गुरौर्वाक्यं मोक्षमूलं गुरोःकृपा ।। ११/ अ. ४।।**

वीरशैव लिंगायतांनी ध्यान करावे श्रीगुरूमूर्तीचे, पूजा करावी श्रीगुरूपदांची, सर्व मंत्रांस मूळ गुरुंचे वाक्य आणि मोक्षास कारण श्रीगुरूंची कृपा असा सिद्धान्त सर्वश्रुत आहे.शैव भक्त गुरुरूपातच शिवरूप माणतात. ब्रह्मा, विष्णू, महेश ही तिन्ही रूपे श्रीगुरुभेटीतच दर्शन देतात ; अशी त्यांची भावना असते. किंबहुना ---- ***सद्गुरूचे कृपेस्तव । ब्रह्मा विष्णू रुद्र देव । हे चालविती विश्वसमुदाव । सामर्थ्ये करुनि गुरुच्या ।। ६१ / अ. ५ ।।*** असे गुरुगीतेत सांगितले आहे.

असे सर्व विस्तृत तत्त्वज्ञान जाणून घेत असताना हेही लक्षात घ्यावे लागेल की *सर्व प्रथम गुरु आशुतोष भगवान शिव* आहेत.शिवापासून निघालेली ही ज्ञानगंगा शिवगणांनी ग्रहण केली त्याला *दिव्यौग* संबोधिल्या गेले. तद्दनंतर शिवगणांकडून सिद्ध महर्षींन्ना प्राप्त झाला तो *सिद्धौघ* आणि त्या सिद्धांकडून ऋषी,मुनी,योगी,आचार्य, गुरु, सद्गुरू यांना प्राप्त झाला तो मानवौघ. अशी ही दिव्य ज्ञान परंपरा. वीराशैवाचारात दिक्षागुरु, शिक्षागुरु, मोक्षगुरू असेही अधिकारानुरूप वर्गीकरण केलेले आढळते.

वीरशैवसंतांनी आपल्या अभंगवाणीतून श्री गुरूंचे महत्त्व वर्णन केलेले आहे. उदाहरणार्थ :

**गुरु देवाचाही देव ।**

**कळे येता अनुभव ।।**

**करी आपणा समान ।**

**तेथे नाही तुजेपण ।।**

असे म्हणत संत महादेव प्रभूनी सद्गुरूंना देवा पेक्षाही श्रेष्ठ मानले आहे.

दुसऱ्या एका अभंगात संत मन्मथ स्वामी म्हणतात.... *गुरुदेव सार गुरुदेव थोर ।* *आदि अगोचर परब्रम्ह ।।*सद्गुरू हेच जीवनाचे सार आहेत. गुरु थोर आहेत, अगोचर आहेत. साक्षात परब्रह्म स्वरूप आहेत.

संत शिवदास माऊली म्हणतात...

**धन्य धन्य गुरुमाय । आज देखियले पाय ।। तुज पाहता माऊली । पाप ताप दैन्य गेली ।।* सर्वच संतांनी सद्गुरूंना धन्यता दिलेली आहे.संत शिवदास म्हणतात, " गुरु साक्षात माऊली आहेत. त्यांच्या दर्शनाने पाप ताप दैन्य दूर जाते. त्यांच्या वचनात अमृताची गोडी आहे. नित्य तृप्तीचा आनंद सद्गुरू संगतीत मिळतो. सद्गुरू सारखा दाता अन्य कोणीही नाही.

शिवसंत लक्ष्मण महाराज म्हणतात,

*गुरु प्रसादाची थोरी । महिमा असे श्रेष्ठ भारी ।।

प्रसाद घेताची स्वामींचा । नाश होय षड्रिपूंचा ।।*... अशाप्रकारे गुरूंना विशेष दर्जा वीरशैव लिंगायत संप्रदायात दिलेला आहे.

तस्मै श्रीगुरवे नमः ।

_*२) लिंग :*_

वीरशैव लिंगायत धर्मात उपासना पद्धतीत स्थावरापेक्षा इष्टलिंग पूजेला विशेष महत्व आहे.लिंग रुपी उपासना हेच व्रत वृत्त मानून वीरशैव लिंगायत भक्त लिंग पूजन करतात.

**लिंग आमुचे जीवन ।*

*लिंग ब्रह्म सनातन ।।*

शिवमयंज्जगत्सर्वं असे म्हणत असताना लिंगापासूनच विश्वाची निर्मिती झाली अशी वीरशैव लिंगायतांची धारणा असते.उत्पत्ती, स्थिती आणि लय याचे प्रतीक म्हणजे लिंग हे शक्तीविशिष्ट शिवाचे प्रतिरूप आहे. बाण हे शिवाचे तर पीठ हे शक्तीचे स्वरूप आहे.

श्रीसिद्धान्तशिखामणी प्रमाण देतो की.....

**पीठिका परमाशक्ति र्लिंगम्साक्षात्परःशिव : ।*

*शिवशक्तीसमायोगं विश्वम् लिंगम् तदूच्यते ।।११-३२*

शिव व शक्ति - प्रकृती पुरुष संबंधातून विश्व निर्मिती हे सारे त्या लिंगातूनच प्रकट झाले असे मानले जाते.

**लिंग देखीले देखिले । ते हे त्रिभुवन विस्तारिले ।*

*स्वर्ग जयाची शाळुंखा । पृथ्वीपाळी पिंड देखा ।।* असे संत ज्ञानेश्वर माऊलींनी सुद्धा सांगितले आहे. लिंगाची अतीव्याप्ती सांगत असताना महात्मा बसवेश्वर सुद्धा आपल्या एका कन्नड वचनातून त्याची महती वर्णन करतात... *जगविस्तार,नभोविस्तार विस्तारातीत असे तव रुप विस्तार. पाताळातीत तव श्रीचरण असे. ब्रह्माण्डातीत तव श्रीमुकुट असे. अगम्य अगोचर अप्रतिम हे इष्टलिंगा! इवलासा झालास येऊनी माझ्या हाता हे कुडल संगमनाथा ।।* अत्यंत विशाल आणि व्यापक रूप असलेला तो शिवप्रभू मात्र आपल्या भक्तांसाठी अगदी छोटासा होऊन इष्टलिंगरूपाने त्याच्या तळहातामध्ये सामावून गेला आहे. असे म्हटले जाते.

इष्टलिंग धारक भक्ताने अन्यत्र कुठेही भक्तीरत न होता...

**एकविधा भक्ती करी त्या लिंगाची ।

नको इतरांची कास धरू ।।*

असे वागले पाहिजे. हे इष्टलिंग साधकाला सद्गुरू कडून शिवदिक्षेच्यावेळी प्राप्त झालेले असते.लिंगधारण विधी मध्ये इष्टलिंगाला शरीर अर्पण करावे, प्राणलिंगाला मन आणि भावलिंगाला तृप्ती अर्पण करावी असा शास्त्रार्थ आहे.

• *पंचसूत्री लिंग* : लिंगात बाण, पीठ व गोमूख असे तीन भाग अत्यंत सूत्रबद्ध पद्धतीने तयार केलेले असतात, त्याला पंचसूत्री लिंग असे म्हणतात. बाणाच्या परिघाच्या मापाएवढी पीठाची लांबी असते. त्याच मापाएवढी गोलाकार पीठाची रुंदी असते, तेवढीच पीठाची उंची आणि परिघाच्या अर्ध्या मापाएवढी गोमूखाची लांबी असावी - याला पंचसूत्र लिंग असे संबोधिले जाते. असा शास्त्रार्थ *वीरशैवाचार प्रदीपिका १-१४/१५* ग्रंथात आलेला आहे. इष्टलिंगाचे प्रमाण *अंगुष्ठामात्र* असते. ते श्रीगुरूंकडून शिवदिक्षेचे वेळी विधिवत धारण करावयाचे असते.शरीरावर ठेवताना ते मस्तक, कंठ, वक्षस्थळ, काखेत, पोटावर आणि तळ हातात धारण करावे असा नियम आहे. परंतु इष्टलिंग चुकूनही जटा, पाठ, नाभिच्या खाली धारण करु नये असा दंडक आहे.कपड्यात गुंडाळून किंवा सोने, पंचधातू, चांदी, पितळ, तांबे आदी धातुंच्या सज्जीकेत ते ठेवले जाते. एकदा शिवदीक्षा घेऊन लिंग धारण केले असता ते कुठल्याही परिस्थितीत शरीरापासून वेगळे केले जात नाही. हा निष्ठावान भक्ताचा लिंगाचार आहे. सकाळ, सायंकाळ, रात्री अशी त्रिकाल लिंगपूजा केली जाते. योगीजन अष्टप्रहर लिंगपूजन करतात. इष्टलिंग पूजा हे महाव्रत समजले जाते.

*_३) जंगम :_*

वीरशैव लिंगायत धर्म परंपरेत जो धर्म तत्त्वज्ञानाचे काटेकोर पालन करतो, आचारधर्म निष्ठेने अनुसरतो व इतरांनाही शिकवतो. तो *जंगम* म्हणून ओळखल्या जातो. ही एक पारमार्थिक अवस्था आहे. ज - जन्मरहीत, ग - गमनरहित आणि म - मरणरहित. अशीही व्युत्पत्ती केली जाते. जो जन्ममरणरहित भव बंधनापासून मुक्त आहे तो जंगम होय.

ग्रंथराज *परमरहस्यात* श्रीसंत शिरोमणी मन्मथ स्वामींनी जंगमाची सात लक्षणें सांगितली आहेत.

**निष्कलंकं निरापेक्षं निर्दोषं धर्ममार्गी।**
**सत्यवाक् सदयं शांतमुक्तं जंगमलक्षणं ।।६।।***

अर्थात जंगमाच्या ठिकाणी पुढीलप्रमाणे सद्गुण असावेत -

निष्कलंक,निरापेक्ष,निर्दोष, निराश,सत्यवादी, दया आणि शांती.

**अवधारी ओ पार्वती। ते सात लक्षण जया अंगी मिरवती। तो जंगम कैलासपति। स्वयेचि बोलिजे ।। ३८।। ते सात लक्षण निर्णय करोनि। एक एक सांगेन विवेचोनि। ते हृदयी धरोनि वर्ते जनी। तोची सत्य शरण ।। ३९।। अध्याय : १० परमरहस्य*** असे जंगम अवस्था तत्त्वज्ञान सांगते.

वीरशैव धर्मात शिवगण वंशज म्हणूनही जंगमास संबोधिले जाते. शिवगोत्र पुरुष वीर, नंदि, भृंगी, वृषभ व स्कंद हे पाच गणाधिश्वर म्हणजे *जंगम* आणि यांचे पाच शिष्य - कालारी, पुरारी, वेदारी, स्मरारी व मखारी हे पंचम म्हणजे *भक्तवर्ग*.

सामान्यतः जंगम हे उपाचार्य असल्यामुळे त्यांनी धर्म शास्त्राचा सखोल अभ्यास करुन वीरशैव लिंगायत आचारधर्म वाढवावा ही अपेक्षा असे. त्यांच्या योग्यतेनुसार म्हणूनच १) स्वयंजंगम - सर्वांभूती समत्वदृष्टी ठेवणारा. शिवध्यान, ज्ञान, एकांत व भिक्षारत असलेला शिवभक्त जंगम.

२) चरजंगम - आत्म स्वरूपात निमग्न असा लौकिकपासून दूर असणारा लोकोद्धारक. याला धर्म पिठाशी संबंधित *चरपट्टाधिकारी* असेही म्हटले जाते.

३) परजंगम - श्रेष्ठ जीवनमुक्त शिवयोगी परजंगम म्हणून गणल्या जातो. सदैव शिवध्यानरत, निस्पृह, निसंग, वृत्तीने विदेही अवस्थेत विचरण करणारा असा तो परजंगम होय.

महात्मा बसवेश्वरादी महाशरणांनी जातीने जंगम असण्यापेक्षा अवस्थेने जंगम होता येते हे आपल्या वचनांनातून निर्देशीत केलेले आहे. जसे की -

**भक्तन हाडी बेड्वात जंगमवल्ल.*

*भक्तन होगळी बेड्वात जंगमवल्ल.*

*भक्तन ओदी बेड्वात जंगमवल्ल.*

*भक्तन कोंडाडि बेड्वात जंगमवल्ल.*

*भक्तन स्तुतिसी बेड्वात जंगमवल्ल.*

*भक्तन कैवारीसि बेड्वात जंगमवल्ल. कूडलचेन्नसंगमदेवरल्ल बेडदे माड्वने भक्त. ।।**

[ वचनोत्सव सौरभ - शरणी शालिनी दौडमनी व.क्र.२१ ]

अर्थात : भक्ताची स्तुती करून मागणारा तो जंगम नाही. भक्ताचे गोडवे गाऊन मागणारा जंगम नाही.भक्ताला संतुष्ट करुन, मोठेपणा देऊन मागणारा जंगम नाही. भक्ताला कुरवाळून गोड बोलून लुटणारा जंगम नाही. भक्ताची स्तुतीकरून भरपूर भिक्षा कमावणारा जंगम नाही. कूडलचेन्नसंगमदेवात,निष्काम भक्ती करणारा भक्त आणि निरपेक्ष शैवाचार करणारा जंगम. अशी समृद्ध परिचार पद्धती शरणांनी सांगितली आहे.

_**४) भस्म :*_

वीरशैवाचारात भस्म धारणाला विशेष महत्व आहे. किंबहुना ज्या मस्तकावर भस्म नाही ते कपाळ करंटे आहे आणि ज्या गावात शिवालय नाही त्याचा धिक्कार असो असेच समजले जाते.

**धिक् भस्मरहितम् भालं धिक् ग्रामम् अशिवालयं ।* [ क्रियासार १ पृ. ८४ ]*

सोपाधिक आणि निरूपाधिक असे भस्मधारणाचे दोन प्रकार. अंतर्यामी शिवाचे ध्यान करणे म्हणजे निरूपाधिक होय. आणि शरीरावर विविध ठिकाणी भस्म ( विभूती ) चर्चीणे म्हणजे सोपाधिक भस्मार्चना होय. गोमया पासून तयार केलेले भस्म अधिक चांगले. तसेच शिवाच्या सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान या पंच मुखापासून पंच तत्वे निर्माण झाली. पंच शक्ति, पंच कला आणि पंच गोमाता या पाच मुखापासून उत्पन्न झाल्या असे मानले जाते.या गोमातांपासून भस्माची उत्पत्ती झाली. १) गोमाता नंदा - विभूती २) भद्रा - भसित ३) सुरभी - भस्म ४) सुशीला - क्षार ५) सुमना - रक्षा असे पाच प्रकारचे भस्म धारण केले जाते.

भस्म निर्मितीविधी / प्रकार - कल्प, अनुकल्प, उपकल्प आणि अकल्प.

भस्मधारण प्रकार - भस्मस्नान, सप्तस्नाने, भस्मोद्धुलन, त्रिपुंड्रधारण - उर्ध्व व तिर्यक. तसेच शरीरावर धारण करण्याची ठिकाणे - ५, ८, १६, ३२ याप्रमाणेही चंद्रज्ञानागाम, बृहज्जाबालोपनिषद, शिवमहापुराणात सांगितली आहेत.

_*५) *रुद्राक्ष*_* :

भस्माप्रमाणेच रुद्राक्ष धारण विधीलाही अनन्य साधारण महत्त्व आहे. ' ***रुद्रस्य अक्षः रुद्राक्षः**** यानुसार रुद्र दृष्टी म्हणजे शिवाच्या अश्रूबिंदूपासून रुद्राक्षांची निर्मिती झाली असे मानले जाते. भस्म - रुद्राक्ष शिवाला अत्यंत प्रिय आहेत.म्हणून वीरशैव लिंगायत भक्त याचे धारण करतात.शेंडीमध्ये १ मुखी ,मस्तकावर २, ३, १२ मुखांचे एकेक असे ३,मस्तकाभोवती ११ मुखी ३६, दोन्ही कानाभोवती ५, ७, १० मुखी प्रत्येकी २ असे ६, कंठात ६ मुखी १६ व ८ मुखी १६ असे ३२, छातीवर ४ मुखी ५०, मनगटात ९ मुखी १२,दंडात १३ मुखी ५० ,आणि गळ्यात १४ मुखी १०८ रुद्राक्षांची माला धारण करावी.किती संख्येने बांधावेत यालाही युक्त शास्त्राधार आहे : [ ग्रन्थराज श्रीसिद्धान्तशिखामणी - ७/५४ ते ५८ ]

साधारणत : अडतीस प्रकारचे रुद्राक्ष मानले गेले आहेत व त्यांच्या प्रकारानुसार धारणेची फलप्राप्ती सांगितली जाते.

_*६) मंत्र :*_

सप्तकोटी मंत्रांचा राजा म्हणून * ***पंचाक्षरी : नमः शिवाय**** मंत्राचा उल्लेख केला जातो. या मंत्राच्या सुरुवातीला ओंकार प्रणव ( ॐ ) जोडला तर हाच मंत्र षडाक्षरी होतो. ***ॐ नमः शिवाय !****

शिवदीक्षा संस्काराचे वेळी श्रीगुरूमुखातून प्राप्त मंत्राचा जप करुन जीवनमुक्त होता येते असे मंत्रविधान आहे. * ***ॐ नमः शिवाय, भव तरणोपाय सुलभ उपाय । तारक मंत्र श्रीगुरूंचा ।।**** असे अभंगकाव्य (पद ) प्रचलित आहे. मंत्र हा भावसागरातून जीवनमुक्त करणारा असतो. म्हणून मनःशांतीसाठी त्याचा नित्य जप केला पाहिजे असे मंत्रविधान आहे.पंचाक्षरी किंवा षडाक्षरी मंत्रास बीजमंत्र असेही म्हणतात. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

***दान्तं बान्तं च यान्तं तु तृतीयस्वरभूषितम् । लान्तयान्तसमायुक्तो मंत्रः पंचाक्षरो भवेत् ।। १५*/ *अध्याय ६ परमरहस्य****

अशाप्रकारे बिजाक्षर संकेताने पंचाक्षर मंत्राचे स्वरूप वर्णिले आहे. याचा अर्थ असा- दान्त म्हणजे त वर्गातील अंतिम वर्ण *न.*

बान्त म्हणजे प वर्गातील अंतिम वर्ण *म.*

यान्त म्हणजे यकारापासून पाचवा वर्ण श. तो तृतीयस्वरभूषित म्हणजे 'इ' स्वराने युक्त *शि.*

लान्त म्हणजे यकारापासून चौथा वर्ण - *वा*.

आणि यान्त म्हणजे अंति यकारयुक्त - *य*.

अशाप्रकारे पंचाक्षरी मंत्र वर्णाक्षरांचा सुंदर मिलाप आहे. *नमः* म्हणजे जिवात्मा आणि *शिव* म्हणजे परमात्मा आणि *अय* म्हणजे ऐक्य अशा अर्थाने *जीव शिवैक्य बोधक* हा मंत्र आहे. [ मायिदेव विरचित अनुभवसूत्र ६/ ४५-४६ ]

साडे तीन मात्रा प्रणवस्वरूप ओंकार ( ॐ ) हा आकार, उकार, मकार बीजाक्षरांचा बोधक आहे. उत्पत्ती - स्थिती - लय ज्यामध्ये होतो तो ओंकार. परमरहस्यात आलेला संदर्भ सांगतो की - * ***नव्हता मायामय विकार । केवळ ब्रह्ममय साचार । तेथे झाले स्फूरण जागर । ॐ नमः शिवाय म्हणऊनी ।।****

ॐ नमः शिवाय या

*षडक्षरमंत्रातील* सहा अक्षरे मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा या षट्चक्रांत वसणाऱ्या आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग व महालिंग या षड्लिंगांची बीजाक्षरे आहेत, असे मरितोंटदार्य म्हणतात.

(अनुभवसूत्र, ६.४७-५२).

ॐ प्रणवसहित पंचाक्षरमंत्र जेव्हा वेगवेगळ्या बीजाक्षरांनी युक्त होतो तेव्हा तो १) प्रसादपंचाक्षर २) मायापंचाक्षर ३) सूक्ष्मपंचाक्षर ४) स्थूलपंचाक्षर आणि ५) मूलपंचाक्षर नावांनी ओळखला जातो.

मंत्र जपाचे प्रकार जाणून घेऊन जप करणे म्हणजे जणू ' *जपयज्ञ* ' च होय.जपाचे प्रकार : १) वाचिक जप - चंचल चित्त स्थिर करते.२) उपांशू जप - मानसिक स्थैर्य प्राप्ती आणि ३) मानस जप - ध्यान प्राप्ती. जपविधी, मंत्रदोष आणि पुरश्चरण या गोष्टींचे ध्यान ठेवून मंत्रसाधना करावी लागते.

*_७) तीर्थ (पादोदक )_*:

*सार सकळ तिर्थाचे । वंद्य पाऊल गुरुचे ॥* असे श्रीसंत मन्मथमाऊली एका अभंगातून निर्देशीत करतात. वीरशैव लिंगायत धर्माचारात तीर्थ / पादोदक विधी सांगितलेला आहे. त्यामुळे मनोमालीण्य दूर होते अशी धारणा आहे.

**_*पाकारः परमम् ज्ञानं दोकारो दोषनाशन : ।*_**

**_*दकारो जन्म दहति ककारः कर्मनाशनः ।।* [ वीरशैवानंदचंद्रिका ]_**

पादोदक म्हणजे परमज्ञानदायक, दोषनाशक, जन्मदाहक आणि कर्मनाशक असे तीर्थ होय.

केवळ पाय धुतलेले पाणी म्हणजे तीर्थ असे नसून विधिपूर्वक सिद्ध केलेले तिर्थच पादोदक म्हटले जाते. त्यानुसार तिर्थाचे भेद याप्रमाणे पडतात - १) त्रिविध पादोदक २) दिक्षा पादोदक ३) शिक्षा पादोदक ४) क्रिया पादोदक आणि ५) ज्ञान पादोदक

*८) प्रसाद :

वीरशैव लिंगायत परंपरेत अष्टावरणातील शेवटचे आठवे आवरण फलश्रुती - प्रसाद. मनाची प्रसन्नता म्हणजे प्रसाद : ”

**_*नैर्मल्यम् मनसो लिंगं प्रसाद इति कथ्यते ।* ” सि.शि.११-६_**

अन्न ग्रहण करणे तेही लिंगास समर्पित करुन म्हणजे एका अर्थाने तो प्रसादच होय अशी दृढ भक्ती वीरशैव लिंगायतांची असते.

**_*लिंगार्पित कर्म परम हाचि धर्म ।*_**

**_*जानोनिया वर्म सुखावला ।।*_** येथे *लिंगार्पितम् वीणा भुंक्ते ।* हिच भावना असते. आपल्या वाटेला आलेला प्रत्येक पदार्थ प्रसाद समजून आधी लिंगार्पित केला जातो आणि मग सेवन केला जातो. त्याचप्रमाणे गुरु कडून मिळालेला प्रसादही विशेष फलदायक मानला जातो.त्याअर्थाने शिवसंत लक्ष्मण महाराजांचा अभंग सुप्रसिद्ध आहे.

**_*गुरु प्रसादाची थोरी । महिमा असे श्रेष्ठ भारी ।।१।। प्रसाद घेताची स्वामींचा । नाश होय षड्रिपूंचा ।।२।।......*_**

याप्रमाणे गुरुप्रसादाने काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ अहंकारादी षड्रिपूंचा नाश होतो. मी तू पणाचे व्दैत दूर होते आणि ब्रह्मानंदाची प्राप्ती होते असा संकेत आहे.

प्रसाद कोणत्या रूपाने प्राप्त होईल ते सांगता येत नाही. शब्दप्रसाद, स्पर्श प्रसाद, नेत्र प्रसाद, वाचासिद्धी, रुप, रस, गंध प्रसाद इत्यादी सिद्धी प्राप्ती हा कृपाप्रसादच म्हणावा लागेल. पदार्थ सेवन करणे आणि प्रसाद ग्रहण करणे हा फरक आहे. मनाची प्रसन्नता ज्यामुळे वाढते तो तो प्रसादच समजावा. इथे समर्पण भावना महत्वाची असते. नैवेद्य समर्पित असते म्हणून त्याला प्रसाद म्हणतात. गुरु, लिंग, जंगम आणि शिवाला अर्पण केलेली प्रत्येक वस्तू प्रसादरुपच असते. अवशिष्ट पवित्र व ग्राह्य असते. प्रसादाला उच्छिष्ट मानले जात नाही. शिवानुग्रह अर्थात शिवसायुज्य प्राप्त करवून देतो तो प्रसाद वीरशैव लिंगायतात अत्यंत अपूर्व मानला जातो आणि श्रद्धापूर्वक सेवन केला जातो.

अशाप्रकारे अष्टावरण विज्ञान कल्याणकारी आहे.

संशोधक / संतचरणरज :

**शि.भ.प.शिवशरण गुरुपदआप्पा रटकलकर**

[ B.Sc.M.A.BEd./Ph.D.App'r ]

लक्ष्मीनगर, हिंगोली

चरभाष : ९४२३९५१००६

GMail : shivsharanguruji@gmail.com